# मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर न्यायालय अंबाजोगाई

कि.दि.अर्ज नं /२०२५

**हिराबाई व इतर विरुध्द निरंक**

**प्रकरण -: बॉम्बे रेग्यूलेशन अक्ट १८२७ ऑफ ८ कलम २ प्रमाणे वारस प्रमाणत्र मिळणे बाबत**

Order
Seen & Filed
Sd/-

Exh-5/D

## शपथपत्र

मी **वैजनाथ पि. तुकाराम जांभळे,** वय- २८ वर्षे, धंदा- शेती, रा. शिवाजी चौक, बर्दापुर, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथील रहिवाशी असुन प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करतो की, सदरील अर्जात मी अर्जदार क्र. ३ असुन अर्जदार क्र. १ हि अर्जदार क्र. २ व ३ जन्मदाती आई आहे. अर्जदार नं १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे जन्मदाते वडील मयत नामे **तुकाराम पि. एकनाथ जांभळे** हे दि. २७/०८/२०२५ रोजी सतत अजारी असल्यामुळे मयत झालेले आहेत. तसेच मयताची आई नामे गंगाबाई एकनाथ जांभळे ह्या सुमारे १७ वर्षापुर्वी मयत झाल्या आहेत. मयत नामे **तुकाराम पि. एकनाथ जांभळे** यांचे ग्रामपंचायत कार्यालय, बर्दापुर यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र, अर्जदारांचे आधारकार्ड, सोबत जोडले आहे. अर्जदार क्र १ ते ३ यांना शासकीय, निमशासकीय कामाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत **तुकाराम पि. एकनाथ जांभळे** यांचे अर्जदार १ ते ३ हेच कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन तसे वारस प्रमाणपत्र अर्जदारांच्या नावे देण योग्य व न्यायाचे आहे. अर्ज मंजूर करण्यात येवून मयत **तुकाराम पि. एकनाथ जांभळे** यांचे अर्जदार नं १ ते ३ हेच कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून तसे प्रमाणपत्र

V. Jambhale

२९/१२/२५
(व.स्तर)

अर्जदारांच्या नांवे देण्यात यावे. सबब शपथपत्र दिले जे खरे आहे असे फक्त.

दि. 29.12.2025.                                        प्रतिज्ञक

**वैजनाथ पि. तुकाराम जांभळे,**
रा. शिवाजी चौक, बर्दापुर, ता. अंबाजोगाई,
जि. बीड

प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करतो की, वरील शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर असून त्यावर मी आज रोजी वाचुन समजुन उमजून स्वाक्षरी केली आहे असे फक्त

दि. 29.12.2025 -                                        प्रतिज्ञक

**वैजनाथ पि. तुकाराम जांभळे,**
रा. शिवाजी चौक, बर्दापुर, ता. अंबाजोगाई,
जि. बीड

मी प्रतिज्ञकास ओळखतो

**ॲड.एस.के.पठाण**
अंबाजोगाई

29/12/25

ॲड. एस.के. पठाण

त्याना मी वैयक्तिक ओळखतो.

29/12/25
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर अंबाजोगाई